**कोरफड**

***Aloe vera*** (L.) Burm. f. Family: **Liliaceae**

**विविध भाषांमधील नावे:** मराठी: कोरफड; संस्कृत: घृतकुमारी; हिंदी: घीकुमारी, इंग्लिश: बर्न प्लांट.



**Morphology:**

Perennial scapigerous herbs or undershrubs. Leaves thick, fleshy, radical, ensiform in rosette. Flowers numerous in racemes on 1-3, simple or branched scapes. Perianth orange-red. Filaments shortly exserted. Capsules cylindrical.

**वनस्पतीचे वर्णन:**

कोरफड ही बहुवर्षायू वनस्पती असून तिचे खोड भूमिगत असते. ती कमी पाण्यावर वाढू शकते. मुळे बारीक, तंतुमय असतात. पाने जाड, मांसल, रसाळ असतात. पानांच्या कडांवरती बारीक काटे असतात. वनस्पतीची २-३ वर्षे वाढ झाल्यानंतर पानांच्या मधोमध एक दांडी येते त्यावरती शेंदरी, नारिंगी रंगांची फुले येतात.

**बहर येण्याचा कालावधी** : सप्टेंबर – जानेवारी

**औषधी उपयोग:**

कोरफडीचा उपयोग मलावरोध, यकृतविकार, कावीळ, सर्दी, पडसे, खोकला, दमा, श्वासाचे विकार, पोट फुगणे, इत्यादी आजारांवर केला जातो. कोरफड ही त्रिदोषनाशक समजली जाते. भाजलेल्या जागेवर मालमसारखा त्याचा वापर करता येतो. पानांचा रस जुनाट ताप, अनेमिया, रक्तशुद्धी, अरुची, आमांश, जलोदर, प्लिहाची सूज, मोठ्या आतड्याची शिथिलता, नेत्रविकार, मूळव्याध यांसारख्या व्याधींवर केला जातो. कोरफडीचा वापर शाम्पू, क्रिम, केशवर्धक, केसांच्या विविध सौन्दर्य प्रसाधनांमध्ये केला जातो. त्वचेच्या विविध समस्यांवर देखील याचा उपयोग केला जातो. विविध फूट केअर क्रीम मध्ये याचा उष्णता शामक म्हणून वापर केला जातो.

**लागवड:**

हे बहुवर्षायू पीक असल्यामुळे जमीन खोलवर नांगरून, भुसभुशीत करून, शेणखत किंवा कंपोस्ट मिसळावे. या वनस्पतीची लागवड सकर्स / पावसाळ्यात तयार होणाऱ्या लहान रोपांपासून केली जाते. ही रोपे २ फूटांवरती लावावीत. पूर्ण वाढ झाल्यानंतर २ वर्षांनी उत्पादन घेता येते. पाने धारदार विळ्याने कापुन घ्यावीत. पानातील रस खाली गळू न देता पाने काढावीत. साधारणपणे ५ वर्षांपर्यंत उत्पादन घेता येते.